# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.11.2025** **वार- शनिवार**

---

**एनडीए**

आगामी शतकातील युद्धांमध्ये शहाणपणा, सहानुभूती आणि बुद्धिमत्तेनं जो नेतृत्व करेल त्याचाच विजय होईल असं प्रतिपादन केंद्रीय लोकसेवा आयोगाचे प्रमुख डॉक्टर अजय कुमार यांनी आज पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४९ व्या तुकडीच्या दीक्षांत सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केलं. या बदलत्या जगात भारत कोणत्या मार्गानं जाईल हे तुम्ही निश्चित कराल, त्यासाठी तुम्ही ज्ञानानं सज्ज असणं गरजेचं आहे असा सल्ला त्यांनी स्नातकांना दिला. दीक्षांत समारंभात ३२९ स्नातकांना जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये ७२ स्नातकांना विज्ञान, ९२ संगणक विज्ञान, ५४ कला शाखा आणि १११बी टेक पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये १५ मित्र देशांच्या स्नातकांचा तर १५ महिला स्नातकांचा समावेश आहे. प्रबोधिनीचे कमांडंट व्हाइस ऍडमिरल अनिल जग्गी, प्राचार्य डॉक्टर विनय दीप यावेळी उपस्थित होते. विज्ञान शाखेचं रौप्य पदक  कार्तिक महेश्वरी, संगणक विज्ञान रौप्य पदक अनन्या बालोनी, कला शाखा रौप्य पदक अनुराग गुप्ता, बी टेक रौप्य पदक पुण्याच्या विश्वेष भालेराव यांना प्रदान करण्यात आलं.

**रबी-पिक-विमा**

रबी हंगामातील पीक विम्यासाठी आत्तापर्यंत केवळ ३ लाख २६ हजार १६८ शेतकऱ्यांनी २ लाख ६ हजार ९९५ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरवला आहे. गेल्या वर्षी सुमारे ५५ लाख शेतकऱ्यांनी हा विमा उतरवला होता. राज्यातील विमा उतरवलेल्या क्षेत्राची एकंदर विमा रक्कम ८२० कोटी रुपये आहे. कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार परभणी जिल्ह्यात सर्वाधिक ५० हजार ४६२ शेतकऱ्यांनी ३३ हजार १२ हेक्टरवरील क्षेत्राचा विमा उतरवला आहे. त्यापाठोपाठ बीड आणि लातूर जिल्ह्याचा क्रमांक आहे. शेवटच्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात अर्ज येतात. त्यामुळं तांत्रिक समस्या निर्माण होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी मुदत संपण्यापूर्वीच पीक विमा उतरवण्याचं आवाहन पुणे  कृषी विभागानं केलं आहे.

**<u>याद्या</u>**

पुणे  जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी गटनिहाय अंतिम मतदार याद्या प्रकाशित झाल्या आहेत. सर्व तहसीलदार कार्यालयांत त्या मतदारांना पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. जिल्ह्यात एकंदर केंद्रांची संख्या ३ हजार ६०५ आहे.

**<u>याद्या</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग-निहाय विभाजित प्रारूप मतदार यादी प्रकाशित करण्यात आली असून मतदारांनी काल संध्याकाळपर्यंत पाच हजार हरकती आणि सूचना नोंदवल्या आहेत. दुबार नाव, नावामध्ये दुरुस्ती, पत्ता, प्रभाग क्रमांक, विधानसभा मतदारसंघ क्रमांक या दुरुस्तीच्या तपशिलासाठी हरकती आणि सूचना नोंदवण्यात आल्या असून यासाठी अंतिम मुदत 2 डिसेंबर आहे.

**<u>कनेक्टींग</u>**

सार्वजनिक आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि समाजकल्याण विभाग यांच्यात योग्य समन्वय साधला, त्याला सामाजिक जनजागृतीची आणि संवेदनशील हाताळणीची जोड मिळाली, तर समाजातील आत्महत्यांचं प्रमाण कमी करण्यात यश मिळेल असं मत पॉलिसी मेकर्स फोरम फॉर मेंटल हेल्थचे अध्यक्ष, डॉक्टर दलबीर सिंह यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. आत्महत्या प्रतिबंधासाठी कार्यरत कनेक्टिंग ट्रस्ट या संस्थेच्या विसाव्या वर्धापनदिनानिमित्त तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत 'आत्महत्या प्रतिबंध आणि मानसिक आरोग्यासाठी नवीन दृष्टीकोन' यावरील विशेष संवादसत्रात बीजभाषण करताना ते बोलत होते. दिवसातील सर्वाधिक काळ विद्यार्थी शाळेत, महाविद्यालय आणि विद्यापीठात वावरतात, तिथंच मानसिक आरोग्याविषयी जागृती करणं गरजेचं असल्याचं डॉक्टर दलबीरसिंह यांनी सांगितलं.

यावेळी राज्यसभेच्या माजी खासदार वंदना चव्हाण, जागतिक आरोग्य संघटनेच्या सदस्या डॉक्टर लक्ष्मी विजयकुमार यांनी विचार मांडले.

वंदना चव्हाण म्हणाल्या की आत्महत्या प्रतिबंधाचं धोरण आहे, मात्र, त्यामधील माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात आपली यंत्रणा कमी पडते.
डॉक्टर लक्ष्मी विजयकुमार म्हणाल्या की, आत्महत्या हे संबंधित व्यक्तीच्या कुटुंबिय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि भवतालाचंही अपयश ठरतं.

**<u>रोजगार</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेचा समाज विकास विभाग आणि लाइट हाऊस कम्युनिटी फाउंडेशन यांच्या वतीनं युवकांसाठी आज रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या मेळाव्यात ५० हून अधिक कंपन्यांनी सहभाग घेत एक हजारपेक्षा अधिक नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या होत्या. या

मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, पदविका तसंच पदवीधर अशा सर्व शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांनी सहभाग घेतला.

**भांडारकर**

प्रार्थना समाज संस्थेतर्फे अच्युत गोडबोले यांना डॉक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याचबरोबर डॉक्टर अभिजित सोनवणे आणि डॉक्टर मनीषा सोनवणे यांच्या सोहम ट्रस्ट संस्थेला महर्षी रामजी शिंदे यांच्या नावाचा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. या पुरस्काराचं वितरण येत्या गुरुवारी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेच्या नवलमल फिरोदिया सभागृहात पार पडणार आहे. संस्थेचे सचिव डॉक्टर दिलीप जोग यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**